# शिवजन्मोत्सव सोहळा समितीतर्फे सिन्नरमध्ये शिवराज्याभिषेक दिन सोहळा

**सिन्नर ।** छत्रपती शिवरायांचा राज्याभिषेक दिन संपूर्ण महाराष्ट्रभर नव्हे तर देशात साजरा होत असतो .रायगडावर छत्रपती शिवरायांचा राज्याभिषेक दिन अतिशय धुमधडाक्यात व मर्दानी खेळांच्या तसेच शहिरांच्या डफा वरील पोवाड्यांनी साजरा होत असतो.प्रत्येकालाच रायगडावर जाता येत नाही म्हणून शिवजयंती उत्सव समिती सिन्नर शाखेने आपल्या छत्रपती शिवरायांचा राज्याभिषेक दिन सिन्नरमध्ये मोठ्या धुमधडाक्याने व फटाक्यांच्या आतिषबाजी मध्ये साजरा केला. यावेळी शिवजन्मोत्सव समितीचे अध्यक्ष विठ्ठल राजे उगले यांनी छत्रपती शिवरायांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.



राज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून शिवजन्मोत्सव सोहळा समितीच्या वतीने सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज चौकामध्ये शिवरायांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून महाराजांना छत्रपती शिवरायांना अभिवादन करण्यात आले. त्यानंतर छत्रपती शिवरायांच्या कार्याचा गौरव म्हणून सुभाष कुंभार, प्रा. राजाराम मुंगसे, हरिभाऊ तांबे, विठ्ठल राजे उगले यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमासाठी सिन्नर नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष विठ्ठलराजे उगले ,गुरुवर्य प्राध्यापक राजाराम मुंगसे, शिवजन्मोत्सव समितीचे माजी अध्यक्ष हरिभाऊ तांबे, समितीचे उपाध्यक्ष सुभाष कुंभार, खजिनदार रवी मोगल, माजी नगरसेवक हरिभाऊ वरंदळ, संतोष उगले, सह खजिनदार अनिल थोरात, राष्ट्रवादी काँग्रेस शहराध्यक्ष अक्षय उगले, पप्पू गोडसे ,वसंत पगार, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष सुभाष कुंभार, योगानंद गवळी, गोपी शिंदे ,अमीत जाधव ,प्रकाश गोरे, मनसेचे तालुका अध्यक्ष रामदास खैरनार, वामनराव वाडे,उमेश गायकवाड, नरेंद्र वैद्य, किसन सींग ,भाजपच्या जिल्हा चिटणीस सविताताई कोठुरकर ,शिवसेनेच्या नाशिक जिल्हा अध्यक्ष कल्पना रेवडे , जिजाऊ ब्रिगेडच्या अध्यक्ष अनिता गांडोळे, शीला चव्हाणके आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पप्पू गोडसे, रामदास खैरनार, राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा शहराध्यक्ष अक्षय उगले, खजिनदार रवींद्र मोगल यांनी मोलाचे सहकार्य केले .तसेच कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.राजाराम मुंगसे यांनी केले व आभार प्रदर्शन सुभाष कुंभार यांनी केले.

# वर्धापनदिनाच्या औचित्य साधून विद्युत सुरक्षा रॅलीचे आयोजन






**मनमाड ।** महाराष्ट्र राज्य वीज मंडळाच्या अर्थात महावितरण कंपनीच्या वर्धापन दिनानिमित्ताने गुरुवारी सकाळी मनमाड शहरातून महावितरणच्या मनमाड उपविभागामार्फत विद्युत सुरक्षा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.आपली जबाबदारी आपली सुरक्षा हे घोषवाक्य घेऊन या रॅलीला एफसीआय रोडवरील महावितरण कार्यालयातून प्रारंभ झाला.

मनमाड विभागाचे कार्यकारी अभियंता संजय तडवी यांच्या हस्ते जनजागृतीचे उद्घाटन करण्यात आले.ही विद्युत सुरक्षा रॅली महावितरणचा एफसीआय रोड कार्यालयातून निघून मनमाड शिर्डी हायवे मनमाड नगरपालिका रोड एकात्मता चौक डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुतळा छत्रपती शिवाजी महाराज चौक महात्मा फुले चौकातून पुन्हा शहराच्या विविध मार्गाने महावितरणच्या कार्यालयात या रॅलीची सांगता झाली या रॅलीमध्ये विद्युत सुरक्षा विषयी जनजागृती करण्यात आली. विद्युत अपघाताचे प्रमाण कमी करण्यासाठी महावितरणने विद्युत सुरक्षा सप्ताह आयोजित करून व्यापक जनजागृती कार्यक्रम हाती घेतला आहे.या रॅली दरम्यान आम्ही सुरक्षेचे शिल्पकार अपघाताने करू महावितरणचे ध्येय साकार अशा घोषणा देण्यात आल्या तसेच विद्युत सुरक्षा कशाप्रकारे करावी विद्युत उपकरणे कशी हाताळावी याविषयी बॅनरद्वारे जनजागृती करण्यात आली रॅलीमध्ये मोठ्या संख्येने महावितरणच्या विभागाचे अधिकारी कर्मचारी सहभागी झाले होते त्यांनी महावितरणच्या सुरक्षा सप्ताह विषयी माहिती दिली तसेच शहरात ठीक ठिकाणी जागृती ची माहिती देणारे पत्रके वितरित करण्यात आली तसेच विविध ठिकाणी सुरक्षा पोर्टर्सही लावण्यात आले असून विद्युत सुरक्षा विषयी जनजागृती करण्यात आली.या रॅलीमध्ये उपकार्यकारी अभियंता भूषण तळले,सहाय्यक अभियंता दत्तात्रय सांगळे,भाऊसाहेब वेताळ,कृष्णा तायडे,दत्तात्रय सांगळे,वैभव लासलगावकर सर्व अधिकारी कर्मचारी या रॅलीमध्ये सहभागी झाले होते. दरम्यान महावितरण तर्फे विद्युत सुरक्षा या विषयावर विद्यार्थ्यांची विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा घेण्यात आली तसेच मनमाड येवला रोडवरील शेजवळ आयटीआयमध्ये महावितरणच्या सहाय्यक अभियंता भूमिका गुप्ता यांचे विद्युत सुरक्षावर व्याख्यान झाले.

# सरस्वतीवाडी येथे विजेचा शॉक लागून पाच मेंढ्या मृत्युमुखी

**देवळा ।** तालुक्यातील सरस्वतीवाडी येथे विजेचा शॉक लागून पाच मेंढ्या मृत्युमुखी पडल्याची घटना घडली असून, मेंढपाळाचे हजारो रुपयांचे नुकसान झाले आहे.



गुरुवारी दुपारी साडेतीन वाजेच्या सुमारास तालुक्यातील सरस्वती वाडी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेच्या आवारालगत असलेल्या डीपी लगत मेंढपाळ आपल्या मेंढ्या चारत असतांना डीपीजवळ एका मेंढीला शॉक लागला असता तिच्या जवळ असलेल्या अन्य चार मेंढ्यांनाही विजेचा धक्का बसल्याने त्यांचाही जागीच मृत्यू झाला. या घटनेच्या वेळी पाऊस सुरू होता. घटनेची माहिती येथील लोकनियुक्त सरपंच चंद्रकांत आहेर यांना समजताच त्यांनी घटनास्थळी दाखल घेऊन याची माहिती वीज वितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांना तसेच पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना दिली. घटनास्थळी पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. एम. यु. औचर तसेच वीज वितरण कंपनीच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी भेट देत मृत मेंढ्यांच्या पंचनामा केला. या मृत्यू पावलेल्या मेंढ्यांवर सायंकाळी उशिरा शवविच्छेदन करण्यात आल्याचे पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगितले. सदर मेंढ्यांच्या मृत्यूचे कारण नेमके समजू शकले नाही. ढोलबारे (ता बागलाण) येथील जिभाऊ पवार यांच्या मालकीच्या ह्या मेंढ्या असून, या घटनेने त्यांचे आर्थिक नुकसान झाले आहे.

# कर्मवीर आहेर महाविद्यालयात पर्यावरण दिन साजरा

देवळा । येथील कर्मवीर रामरावजी आहेर महाविद्यालयात राष्ट्रीय छात्र सेना विभागाच्या वतीने जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात आला. राष्ट्रीय छात्र सेना विभागाने महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपन केले व विद्यार्थ्यांना वृक्ष देण्यात आले. सटाणा महाविद्यालयाच्या प्रा. डॉ. सुनिता शेवाळे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.




यावेळी प्राचार्य डॉ. हितेंद्र आहेर, संस्थेच्या सचिव प्रा. डॉ. मालती आहेर आदी उपस्थित होते. यावेळी पर्यावरण विषयी जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. वनस्पती शास्त्र विभागाचे प्रमुख उपप्राचार्य डॉ.डी. के.आहेर यांनी संपूर्ण भारतामध्ये प्लास्टिक मुक्त चळवळ उभी करून प्लास्टिक हे किती आरोग्यास हानिकारक आहे. आपण कशा पद्धतीने त्याचा वापर कमी करू शकतो यासाठी प्रयत्न करणे गरजेचचे आहे. काळानुसार आज मानवी जीवनाच्या गरजा बदलल्या आहेत. प्लास्टिकमुळे आज पृथ्वीच्या आरोग्याला मोठा धोका निर्माण झाल्याने यंदाचा पर्यावरण दिन हा प्लास्टिक प्रदूषणाचा अंत या संकल्पनेवर आधारित असून, पर्यावरणाचे जतन, संवर्धन आणि प्रदूषणाविरोधात जनजागृती निर्माण करणे हा या दिनामागील प्रमुख उद्देश आहे. प्लास्टिकचा अंत हा फक्त पर्यावरणासाठी नाही तर मानवी आरोग्य, भविष्यातील अन्नसुरक्षा आणि जैवविविधतेच्या रक्षणासाठी अत्यावश्यक आहे. त्यामुळे आपल्या सवयी, विचार आणि कृतीत बदल घडवून आपण प्लास्टिकमुक्त भविष्य घडवू शकतो असे सांगितले. यावेळी विद्यार्थ्यांना पर्यावरण विषयी जनजागृती ची शपथ डॉ. विलास वाहुळे यांनी दिली. कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ.जयवंत भदाणे, राष्ट्रीय छात्रसेना विभाग प्रमुख लेफ्टनंट बादल लाड, डॉ.संजय बनसोडे, प्रा.वामन काकवीपुरे, डॉ. जयमाला चंद्रात्रे, डॉ. राकेश घोडे प्रा.चंद्रकांत दाणी, प्रा.जालिंदर कडू, प्रा. रवींद्र पगार, प्रा. यशवंत खैरनार, कार्यालयीन अधीक्षक दिनेश वाघमारे आदींसह छात्र सेनेचे विद्यार्थी उपस्थित होते.

# कारसूळच्या सरपंचपदी मनिषा काजळे यांची बिनविरोध निवड

**पिंपळगाव बसवंत ।** निफाड तालुक्यातील मौजे कारसूळ ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी मनिषा काजळे यांची बिनविरोध निवड झाली असून गावाने एकतेचे प्रतीक ठरवत संघटनशक्तीचा आदर्श उभा केला आहे. माजी सरपंच स्वाती काजळे यांच्या राजीनाम्यानंतर सरपंचपद रिक्त झाले होते. त्यावर मनिषा काजळे यांचा एकमेव अर्ज आल्याने ही निवड बिनविरोध घोषित करण्यात आली.



या प्रक्रियेसाठी सूचक म्हणून उपसरपंच शामराव शंखपाळ यांनी प्रस्ताव मांडला, तर निवडणूक निर्णय अधिकारी ज्ञानेश्वर केसरे यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण प्रक्रिया पार पडली.या निवडणुकीत ग्रामपंचायत अधिकारी संदीप पाटील, तलाठी देवेंद्र लोढा, कोतवाल सागर चारोस्कर आणि शिपाई नंदू गांगुर्डे यांनी प्रशासनाच्या वतीने महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या पार पाडल्या. निवडीच्या झालेल्या बैठकीस ग्रामपंचायतीचे सर्व नऊ सदस्य उपस्थित होते. यामध्ये माजी सरपंच स्वाती काजळे, उपसरपंच शामराव शंखपाळ, सदस्य देवेंद्र काजळे, आशा ताकाटे, उज्वला गांगुर्डे, अमोल ताकाटे, पुनम पगार, भाऊसाहेब कंक सहभागी होते. निवडीची घोषणा होताच गावात जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले. ग्रामस्थांनी फटाके फोडून, पेढे वाटून व पुष्पगुच्छ देत मनिषा काजळे यांचे हार्दिक स्वागत केले. निवडीचे स्वागत करताना गावातील अनेक मान्यवर, ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये सिताराम जाधव, भाऊसाहेब शंखपाळ, मधुकर ताकाटे, निवृत्ती ताकाटे, शरद ताकाटे, बाळासाहेब गांगुर्डे, बाजीराव ताकाटे, दिलीप ताकाटे, प्रकाश ताकाटे, रामनाथ शंखपाळ, संतोष ताकाटे, मोहन पगार, उद्धव गाडे, संजय जगताप, विश्वनाथ काजळे, उद्धव काजळे, हेमंत काजळे, संजय ताकाटे, साहेबराव जाधव, प्रभाकर जाधव, विजय उगले, साहेबराव पगार, संतोष जाधव, संजय जाधव, शरद ताकाटे, प्रवीण ताकाटे, सोमनाथ देवरे यांचा समावेश होता.

# होळकर यांचे कार्य शासनकर्त्यांसाठी प्रेरणादायी : आ. डॉ. आहेर

**देवळा ।** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी त्यांच्या शासन काळात हिंदू धर्म रक्षणासाठी केलेले काम आजच्या शासनकर्त्यांसाठी प्रेरणादायी असून त्यांनी ठीक ठिकाणी बांधलेल्या बारव त्यांच्या मोठ्या दूरदृष्टीचे प्रतीक आहे. त्या प्रेरणेतूनच भविष्यात तरुण कार्यकर्त्यांकडून लोकाभिमुख कार्य उभे राहील असा आशावाद चांदवड देवळा विधानसभा मतदारसंघाचे आ. डॉ. राहुल आहेर यांनी व्यक्त केला.



शनिवार दिनांक ३१ रोजी पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्मोत्सवानिमित्त देवळा तालुका भारतीय जनता पार्टी च्या वतीने पिंपळगाव (वा.) येथे आयोजित कार्यक्रम प्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी जयंतीचे औचित्य साधून भव्य रक्तदान शिबिर, निबंध व रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख पाहुणे म्हणून देवदारेश्वर येथील महंत गणेशानंदपुरीजी महाराज, उमराणे कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रशांत देवरे, डॉ रमणलाल सुराणा, मविप्रचे माजी संचालक प्रमोद पाटील, भाजपा तालुकाध्यक्ष किशोर आहेर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाप्पा महाजन यांनी केले. यावेळी विनायक वाघ, समाधान सोनजे, योगेश खैरनार, दिनेश वनसे, राजू सोनजे, भावसा साबळे, विकी थोरात, रवी बागुल, दत्तू गाढे, साहेबराव शिरसाट, गयाजी पल्हाळ, जगदीश पगार, केदा गाढे, बंडू गोराणे, समाधान शिरसाठ, पंकज पगार, भैय्या सोनजे, नंदू सोनजे, गणू सोनजे, अभय सोनवणे आदींसह भाजप कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## खा. शोभाताई बच्छाव यांनी दिली भेट

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून पिंपळगाव (वा.) येथील स्मारकात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पिंपळगावच्या माहेरवासीन, धुळे लोकसभा मतदार संघाच्या खासदार शोभाताई बच्छाव यांनी त्या ठिकाणी भेट देऊन अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन केले.

## महत्त्वाचे

### वृक्ष लागवड करून पर्यावरण दिन साजरा

**पिंपळगाव बसवंत ।** मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे कर्मवीर काकासाहेब वाघ कला,




विज्ञान आणि वाणिज्य पिंपळगाव बसवंत महाविद्यालयात ५ जून जागतिक पर्यावरण दिनानिमित्त महाविद्यालयाच्या मैदानावर दीर्घायुष्य व भरपूर ऑक्सिजन देणाऱ्या वृक्षांची लागवड महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफे.(डॉ.) सुरेश जाधव यांच्या शुभहस्ते करण्यात आली. याप्रसंगी उपप्राचार्य दिलीप माळोदे क्रीडाधिकारी प्रा. हेमंत पाटील, डॉ. मोहन कांबळे, कवी संदीप जगताप, प्रा. उत्तम जाधव, ग्रंथपाल अमोल मेहंदळे, महाविद्यालयाचे रजिस्टार डी. एस. मवाळ, कार्यालयीन अधीक्षक संदीप नाठे, महाविद्यालयातील शिक्षक वृंद व राष्ट्रीय नौकानयन पदक विजेते अल्पेश धुळे, मयूर तारू आदी उपस्थित होते.

# घर क्रमांकाचे प्लेटसाठी गटविकास अधिकाऱ्यांचे अजबच पत्र

## पत्र परत घ्या अन्यथा आंदोलन : चारोस्कर

**दिंडोरी ।** गाव पातळीवर ग्रामपंचायत हददीतील घरांना क्रमांक देणे आवश्यक असल्याच्या कारणावरून एका एजन्सीला तालुक्यातील प्रत्येक गावात पाठवून नागरीकांकडून त्या बदल्यात ५० रूपये वसुली करण्यासाठी दिंडोरी गटविकास अधिकाऱ्यांनीच पत्र काढल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. सक्तिचे पत्र गटविकास अधिकाऱ्यांनी काढतांना त्याच्या मोबदल्याचाही बंदोबस्त त्यांनी स्वतःच करावा आणि तरतूद नसेल तर घरमालकांना त्यांच्या सोयीनुसार घर क्रमांकाचे प्लेट बसवण्यासाठी सांगावे त्यासाठी ठराविक एजन्सीला घरापर्यंत पाठवून सक्ती करण्याचे पत्र गटविकास अधिकाऱ्यांनी मागे घ्यावे अन्यथा ग्रामीण जनतेवर लादत असलेल्या या सक्तीच्या प्रक्रियेवर आवाज उठवला जाईल असा इशारा माजी आमदार रामदास चारोस्कर, योगेश बर्डे , शाम हिरे, तुकाराम जोंधळे आदींनी दिला आहे.




गटविकास अधिकाऱ्यांनी सर्व तालुक्यातील ग्रामपंचायतींना एक पत्र काढले आहे त्यात नमूद करतांना ग्रामपंचायत क्षेत्रातील घरांची संख्या जनगणना करणे, कर आकारणी करणे, बी.पी.एल. मतदार यादी बनविणे, शिधा पत्रिका तयार करणे इत्यादी कामसाठी गाव पातळीवर ग्रामपंचायत हददीतील घरांना क्रमांक देणे आवश्यक आहे. यासाठी श्री. कृपाशंकर गुप्ता हे घर क्रमांकाचे नंबर प्लेट बनवून देण्याचे काम घर मालकांकडून रु.५०/- (अक्षरी पन्नास रुपये) च्या मोबदल्यात करत आहेत. सदरच्या घर क्रमाकांच्या नंबर प्लेट वर कुटूंब कल्याण कार्यक्रम, लाडकी बहिण योजना, एडस नियंत्रण बाबत संदेश कोविड-१९ बाबत जनजागृती, बेटी बचाव बेटी पढाव, हर घर शौचालय अशा शासनाच्या विविध योजनांची प्रसिध्दी करण्यास मदत होईल व शासनाच्या योजनांची प्रसिध्दी होईल यासाठी संदर्भिय पत्रात नमुद केलेले इसम श्री. कृपाशंकर गुप्ता, सांताकृझ, मुंबई यांना ग्रामपंचायत हददीतील घरांची यादी पुरविल्यास घर क्रमांकाची नंबर प्लेट घरावर लावून देतील. अशा आशयाचे पत्र दिंडोरीचे गटविकास अधिकारी भास्कर रेंगडे यांनी काढलेले आहे. परंतु ही सक्ती कशासाठी ? ठराविक व्यक्तींच्या एजन्सी कडूनच आम्ही का घ्यावे? असा सवाल उपस्थित होत असून गटविकास अधिकाऱ्यांनी फक्त सूचना कराव्यात आणि आवश्यक असल्यास गाव स्तरावर कमी खर्चामध्ये जर कोणी काम करून देत असेल तर त्यांच्याकडून घर नंबरचे प्लेट बनवण्याची परवानगी द्यावी अशी मागणी होत असून विनाकारण आपल्या हितसंबंधातून नागरिकांच्या माथी एखादी एजन्सी लावून त्यांच्याकडून आर्थिक वसुली करण्याचा प्रकार गटविकास अधिकाऱ्यांनी करू नये अशी मागणी देखील होत आहे.

संबंधित गटविकास अधिकारी भास्कर रेंगडे यांनी सदर दिलेले पत्र मागे घेत गावस्तरावर निर्णय घेण्याचा अधिकार संबंधित ग्रामसेवकांना द्यावा अन्यथा या सक्तीच्या विरोधात आवाज उठवला जाईल व त्यास संबंधित गटविकास अधिकारी जबाबदार असतील असा इशाराच माजी आमदार रामदास चारोस्कर, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे दिंडोरी लोकसभा समन्वयक योगेश बर्डे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष शामराव हिरे, वसंत थेटे, विठ्ठलराव अपसुंदे, तुकाराम जोंधळे,राकेश शिंदे आदींनी दिला आहे.

# ‘महासागरा’च्या दणक्यानंतर त्र्यंबक नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी देवचक्के यांच्या कारभाराची चौकशी सुरू

## मंत्री गिरीश महाजनांनी दिले चौकशीचे आदेश

**नाशिक ।** आपल्या वादग्रस्त कारभारामुळे त्र्यंबक नगर परिषदेच्या मुख्याधिकारी श्रीया देवचक्के या पुन्हा एकदा चर्चेत आले असून भूमाफियांची अतिक्रमणे धनदांडग्यांची मनमानी आणि त्रंबक नगर परिषदेकडून सुरू असलेली कोट्यवधी रुपयांची कामे याबाबत दै 'महासागर' ने नगरपरिषदेच्या भ्रष्ट कारभाराची पोलखोल केली होती. त्याची दखल घेत मंत्री गिरीश महाजन यांनी नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी श्रीया देवचक्के यांच्या कारभाराची चौकशी सुरू केली असून त्यामुळे देवचक्के यांच्या विरुद्ध काय कारवाई होणार याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. नगरपरिषदेच्या चौकशीला कालपासून सुरुवात झाली असून दोन दिवस चालणाऱ्या या चौकशीत नेमके काय बाहेर येते याबाबत त्रंबकवासियांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे.

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर त्र्यंबकेश्वर येथे साधूमहंत आणि भाविकांची गैरसोय होऊ नये म्हणून शासन स्तरावर युद्ध पातळीवर नियोजन सुरू असून त्यातच त्र्यंबक नगर परिषदेच्या मुख्याधिकारी श्रीया देवचक्के यांच्या बेजबाबदार कार्यपद्धतीमुळे नियोजनात




कुठलीही कसूर राहू नये यासाठी मंत्री गिरीश महाजन यांनी त्र्यंबक नगर परिषदेच्या कारभाराची चौकशी करण्याचे आदेश जिल्हाधिकारी जलजी शर्मा यांना दिले आहेत.

कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर मंत्री गिरीश महाजन यांनी काही दिवसांपूर्वी त्र्यंबक येथे अधिकारी आणि विविध आखाड्यांच्या साधुमहंतां समवेत परिसराची पाहणी करून आढावा घेतला होता. यावेळी स्थानिक नागरिकांनी त्र्यंबक नगर परिषदेच्या मुख्याधिकारी श्रीया देवचक्के यांच्या कार्यपद्धतीबाबत तक्रारी केल्या होत्या. नगर परिषदेच्या भ्रष्ट कारभाराविषयी आवाज उठवल्यास त्याच्याविरुद्ध अतिक्रमणाची कारवाई केली जात आहे. अशा नियमबाह्य कारवाईमुळे देवचक्के यांच्याबाबत तक्रारी वाढल्या होत्या. याशिवाय माझी वसुंधरा आणि इतर कामांच्या संदर्भात मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याचे दै.'महासागर'ने उघडकीस आणले होते.त्याची दखल घेत मंत्री गिरीश महाजन यांनी जिल्हाधिकाऱ्यांना याबाबत चौकशीचे आदेश दिले. त्यानुसार इगतपुरी त्र्यंबकचे उपविभागीय अधिकारी ओंकार पवार यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली असून त्यानुसार कालपासून त्रंबक नगर परिषदेच्या कारभाराची चौकशी सुरू करण्यात आली आहे. दोन दिवस चालणाऱ्या या चौकशीमध्ये तक्रारीं संदर्भातील कागदपत्रे सादर करण्याचे आदेश मुख्याधिकाऱ्यांना दिले आहेत. शासनाने तक्रारीची दखल घेतल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. दरम्यान या चौकशीमध्ये देवचक्के यांच्या कारभाराची पोलखोल होण्याची दाट शक्यता वर्तवली जात असून त्यांच्यावर त्यांच्याकडून कोणती कारवाई होणार याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.




## ➤ महत्त्वाचे

### वाळलेल्या झाडाची फांदी पडली; जीवितहानी टळली

**देवळा ।** येथील कळवण रस्त्यावर वाळलेल्या झाडाची फांदी पडल्याने सकाळी फिरायला गेलेल्या ज्येष्ठ नागरिक थोडक्यात चुकले आणि



पुढील अनर्थ टळला. यामुळे रस्त्याच्या कडेला वाळलेली झाडे काढण्याची मागणी होत आहे. देवळा-कळवण रस्त्यावर येथील अनेक ज्येष्ठ तसेच युवा व महिला नागरिक सकाळी व सायंकाळी चालण्याचा व्यायाम करतात. शुक्रवार (दि.६) रोजी सकाळी सव्वापाच वाजेच्या सुमारास ज्येष्ठ नागरिकांचा गट चालत असताना अचानक आठ-दहा फूट अंतरावर वाळलेल्या झाडाची मोठी फांदी पडली. अजून काही पावले ते पुढे राहिले असते तर कदाचित ही फांदी त्यांच्यावरच पडली असती. मात्र सुदैवाने ते थोडक्यात बचावले. येथील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ हितेंद्र आहेर, डॉ.व्ही.एम.निकम, दिलीप पाटील, डी. डी.आहेर, शिवाजी आहेर, प्रा.पोपट सागर यांनी हा अनुभव कथन करत तातडीने वाळलेली झाडे काढण्याची मागणी केली. यापूर्वी काहींच्या वाहनांवर, अंगावर अशा झाडांच्या फांद्या पडल्याची उदाहरणे ताजी असताना त्यात ही घटना घडल्याने नागरिक धास्तावले आहेत. सार्वजनिक बांधकाम खात्याने याची दखल घेत तातडीने वाळलेली झाडे काढावीत अशी मागणी करण्यात आली आहे.

### खर्डे ग्रामपंचायतीतर्फे शिवराज्याभिषेक दिन

**देवळा ।** तालुक्यातील खर्डे ग्रामपंचायतीच्या वतीने शुक्रवारी दि ६ रोजी शिवराज्यभिषेक दिन




मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला . यावेळी ग्रामपंचायत कार्यालयासमोर गुढी उभारण्यात आली . या गुढीचे व छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे ग्रामपंचायत सदस्या साखरबाई यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. यावेळी सरपंच जिभाऊ मोहन, उपसरपंच भाग्यश्री पवार, ग्रामपंचायत सदस्य कृष्णा आहिरे,खुशाली देवरे, सुनीता गांगुर्डे, अनिता माळी, आशाबाई देवरे, अनिल पवार,संगीता पवार, आशा पवार,वाळी पवार, साखरबाई माळी, सुनील जाधव, ग्रामपंचायत अधिकारी अरुण आहेर आदींसह जेष्ठ नागरिक हभप किसन आप्पा मोरे, जितेंद्र पवार, माजी उपसरपंच राहुल देवरे, शशिकांत ठाकरे, समाधान देवरे, भाऊराव मोरे, बाळा जाधव, राहुल मोरे शाळेतील विद्यार्थी आदी उपस्थित होते.

### रामदास पवार यांचे निधन

**देवळा ।** भऊर (ता. देवळा) येथील



प्रगतिशील शेतकरी रामदास उर्फ बापू सिताराम पवार (६५) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा, दोन मुली, सून, नातवंडे दोन भाऊ, दोन बहिणी असा परिवार आहे. देवळा येथील उद्योजक व किशोर सूर्यवंशी पतसंस्थेचे व्हा. चेअरमन कौतिक पवार व शेतकरी जगन्नाथ पवार यांचे बंधू तर प्रवीण (पप्पू) पवार यांचे ते वडील होत.

## 'एमआयटी निसर्गस्नेही महिला मंच' नाशिक जिल्हा शाखा स्थापनेच्या नियोजनासाठी बैठक

**नाशिक ।** 'एमआयटी निसर्गस्नेही महिला मंच' नाशिक जिल्हा शाखा स्थापनेच्या नियोजनासाठी नुकतीच बैठक झाली. त्यात 'नाशिक जिल्हा समन्वयक' या प्रमुख पदावर सामाजिक कार्यकर्त्या सुरेखाताई सोनवणे यांची नियुक्ती करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला. 'एमआयटी,पुणे' या ख्यातनाम शिक्षणसंस्था समुहाच्या अंतर्गत 'एमआयटी-नॅशनल वुमन्स पार्लमेंट' या महिला महामंचांची स्थापना करण्यात आली आहे.

राष्ट्रीय स्तरावर महिला सशक्तिकरणासाठी विविध उपक्रम आयोजित करणे हा या मंचाचा प्रमुख कार्यउद्देश आहे. 'एमआयटी - नॅशनल वुमन्स पार्लमेंट' या महिला महामंचाच्या अंतर्गत महाराष्ट्र राज्याच्या प्रत्येक जिल्हा



शहरात हा नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहे. महिलांचे अराजकीय स्वरूपात संघटन करून आरोग्य, स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, सेंद्रिय कृषी उत्पादनांविषयी जागृती तसेच महिला उद्योगनिर्मिती इत्यादी विविध विषयांविषयीचे कार्यक्रम या उपक्रमांतर्गत आयोजित करण्यात येतात. नाशिक शहरात हा मंच स्थापन करण्याविषयी नियोजन करण्यासाठी नाशिक येथे 'एस.के.हॉटेल' च्या मिटिंग हॉल मध्ये नाशिकमधील निवडक महिलांची बैठक आयोजित करण्यात आली. सुरेखाताई सोनवणे यांनी ही बैठक आयोजित करण्यासाठी पुढाकार घेतला. बैठकीसाठी नाशिक शहरातील सुजाताताई घुगे, चैतालीताई कांगणे, प्रियाताई बोडके, मंगलताई दराडे, निकिताताई ईलग, वैशालीताई पोतदार, योगिताताई आव्हाड, आशाताई कदम यांना निमंत्रित करण्यात आले होते. 'एमआयटी-राष्ट्रीय सरपंच संसदे'चे प्रमुख समन्वयक योगेश पाटील यांनी या बैठकीत निमंत्रित महिलांना या मंचची संकल्पना व त्या अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या महिला सक्षमीकरणाच्या उपक्रमांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. 'राष्ट्रीय सरपंच संसदे'चे नाशिक विभाग समन्वयक सुनील दराडे हे यावेळी उपस्थित होते. पुढील पंधरवड्यात नाशिक शहरातील निवडक २५ महिला सदस्यांना 'एमआयटी, पुणे' येथे विशेष बैठकीसाठी निमंत्रित करण्याचे यावेळी निश्चित करण्यात आले. पुणे बैठकीत 'एमआयटी' शिक्षणसंस्था समूहाचे कार्याध्यक्ष राहुल कराड पुढील कार्यासाठी या महिला ग्रुपला मार्गदर्शन करतील.

## देवळा नगरपंचायतीतर्फे जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण

**देवळा ।** "जागतिक पर्यावरण दिन ",माझी वसुंधरा अभियान 6.0 व 'एक पेड मा के नाम' मोहिमे अंतर्गत देवळा नगरपंचायतीच्या वतीने येथील स्मशानभूमी व घनकचरा प्रकल्प परिसरात नगराध्यक्षा भाग्यश्री पवार, उपनगराध्यक्ष संजय आहेर, नगरसेवक करण आहेर, हितेश आहेर, मुख्याधिकारी प्रमोद ढोरजकर यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

या कार्यक्रमाप्रसंगी माझी वसुंधरा अभियान- हरित शपथ व जागतिक स्तरावर प्लास्टिक प्रदूषणाचे निर्मूलन अंतर्गत स्वच्छ भारत, हरित भारत- हरित प्रतिज्ञा घेण्यात आली. यावेळी नगरपंचायतीचे कार्यालयीन विभाग प्रमुख नितीन भवर, स्वच्छता निरीक्षक अजय बच्छाव, शहर समन्वयक दिग्विजय देवरे, लेखापरीक्षक जुगल घुगे, रचना सहाय्यक अपूर्वा डोळे, शरद पाटील, विकास आहेर, चंद्रकांत चंदन यांच्यासह अन्य विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. प्रारंभी नगराध्यक्षा,



उपनगराध्यक्ष यांच्या हस्ते वृक्षारोपण झाल्यानंतर नगरसेवक व अधिकारी, कर्मचारी यांनी देखील वृक्षारोपण केले. यावेळी वृक्ष संवर्धनाबाबत शपथ देण्यात आली व वृक्षसंवर्धनाची जबाबदारी सोपविण्यात आली. वृक्षारोपण ही काळाची गरज असून, राष्ट्रीय कार्य समजून प्रत्येकाने वृक्ष लागवड व संवर्धनावर भर द्यावा. वृक्षतोड होणार नाही, यासाठीही प्रत्येकाने प्रयत्न करणे गरजेचे आहे. आज देशात पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी वृक्षारोपण करणे अत्यंत गरजेचे असल्याचे प्रतिपादन उपनगराध्यक्ष संजय आहेर यांनी यावेळी केले.

## ‘गोल्फ क्लब’वर उद्योजक साहेबराव साळुंखेंचा वाढदिवस साजरा

**नाशिक ।** शेकडो बेरोजगारांना आपल्या कंपनीत काम देऊन त्यांच्या जीवनात प्रकाश निर्माण करणारे उद्योगपती साहेबराव साळुंखे यांच्या सारख्या माणसांची समाजाला अत्यंत गरज आहे, असे मत भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नगरसेवक सतीषबापू सोनवणे यांनी व्यक्त केले. येथील ज्येष्ठ उद्योजक साहेबराव साळुंखे यांचा ६६ वा वाढदिवस गोल्फ क्लब मैदानावर मोठ्या उत्साहात साजरा झाला. येथील प्लेमेंट ग्रुपने कार्यक्रमाचे नियोजन केले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शेखरआप्पा निकुंभ होते.

श्री. सतीश सोनवणे म्हणाले की, मराठी माणूस उद्योग जगतात पोहोचलाच पाहिजे. पण त्याने आपल्याबरोबर मराठी माणसाला हात दिला पाहिजे. साळुंखे यांच्यासारखी माणसे बहुजन समाजाला मदत करण्यासाठी नेहमी पुढाकार घेतात. त्यांच्यासारख्या



माणसांची समाजाला गरज आहे असे मतही त्यांनी व्यक्त केले. यावेळी ज्येष्ठ उद्योगपती व ढकांबे येथील पेट्रोल पंपाचे मालक अण्णासाहेब बोडके म्हणाले की, साळुंखे यांनी अनेक गरिबांना आधार दिला आहे. त्यांच्याकडून अनेक गोष्टी शिकण्यासारख्या आहेत. आपण देखील इथून पुढे समाजाला मदत करण्यासाठी पुढाकार घेऊ, अशी शपथ त्यांनी यावेळी घेतली.

दीपक भोसले, अँड. कोकाटे, भाजपचे नेते गणेश कांबळे, प्रशांत कोतकर, माणिकराव काठे, नाना भागवत, रमेश गायकवाड, ठाकरे मामा, रविंद्रअण्णा बोडके, अँड. धर्मेंद्र चव्हाण, हरिभाऊ टीळे, आप्पा कुलकर्णी, के. एम. गारे, प्रा. मिरजकर, वसंतराव मुळाणे, मधुकर जाधव, दिलीप जाधव, मधुकर गावित, पगारे साहेब, जॉनी शिंदे, सुभाष कडलग, शशीभाई कन्सारा, नितीन साळवे, बाबा शहा, राजू पटेल, माजी नगरसेवक लक्ष्मण धोत्रे आदी यावेळी उपस्थित होते. श्री. साळुंखे यांचे मानसपुत्र शिवा देशमुख यांनी सूत्रसंचालन केले. बॉस्को निकुंभ यांनी आभार मानले.

## गुणवंत विद्यार्थ्यांचा सप्तश्रृंगी गडावर सत्कार

**सप्तश्रृंग गड ।** सप्तशृंगी गड येथील चालत बोलत मदत केंद्र ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष व उपसरपंच तथा सामाजिक कार्यकर्ते संदीप बेनके यांच्यावतीने इयत्ता दहावी आणि बारावी परीक्षेत घवघवीत यश संपादित केलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा फेनिक्यूलर रोपवे येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

अध्यक्षस्थानी मा,जि,प,. अध्यक्षा, नाशिक जयश्रीताई पवार यांच्या शुभहस्ते पार पडण्यात आला विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करून पाठीवर शाब्बासकीची थाप देऊन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थीना जयश्री पवार यांच्या हस्ते 40 सन्मानचिन्ह प्रशस्तीपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला या सत्कारामुळे त्यांना भविष्यात अधिक चांगले कार्य करण्यासाठी विद्यार्थी प्रेरित होतात आणि विद्यार्थ्यांमध्ये एक सकारात्मक वातावरण प्राप्त होते असे मत जयश्री पवार यांनी व्यक्त केले सूत्रसंचालन संकेत नेवकर यांनी केले




यावेळी सप्तशृंगी गडावरील सरपंच रमेश पवार ट्रस्टचे व्यवस्थापक सुदर्शन दहातोंडे कार्यकारी अधिकारी भगवान नेरकर कार्यलियन अधीक्षक प्रकाश जोशी ग्रामसेवक संजय देवरे ग्रामपंचायत सदस्य राजेश गवळी, ग्रामस्थ शांताराम गवळी, दीपक जोरवर, माधुरी दीक्षित, किरण डांगे, कैलास पानमळे, किशोर करवर, सोपान कोडमांगले आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ब्रह्माकुमारी संस्थेच्या शिवदर्शन सरोवर परिसरात पर्यावरण दिन उत्साहात







**त्र्यंबकेश्वर ।** येथील पेगलवाडी या ठिकाणी ब्रह्माकुमारी संस्थेच्या निर्माणाधीन शिवदर्शन सरोवर परिसरात पर्यावरण दिनानिमित्त उपक्षेत्रिय संचालिका ब्रह्माकुमारी वासंतीदीदीजी यांच्या अध्यक्षतेखाली वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगराध्यक्ष त्रिवेणीताई तुंगार, डॉ. अनुजा बोरसे, डॉ. पंकज बोरसे, त्र्यंबकेश्वर मंदिर विश्वस्त संतोष कदम, त्र्यंबकेश्वर वनपरिक्षेत्र अधिकारी सामाजिक वनीकरण प्रियंका उबाळे, ब्रह्माकुमारी पूनम दीदी, ब्रह्माकुमारी ज्योती दीदी, ब्रह्माकुमारी मंगल दीदी आदी मान्यवर उपस्थित होते.

त्र्यंबक घोटी रोडवरील पहिने या पर्यटन स्थळाजवळील पेगलवाडी या परिसरात सहा एकर भूखंडावर भव्य शिवदर्शन म्युझियमचे नवनिर्माण होत आहे. येथे येणाऱ्या भाविक भक्तगण व पर्यटकांसाठी ह्या ठिकाणी सुख शांती व भगवंताच्या आराधनेचे भव्य स्थान निर्माण होईल असे मनोगत ब्रह्माकुमारी वासंतीदीदीजी यांनी याप्रसंगी केले. पर्यावरण दिनाचे औचित्य साधून करण्यात आलेल्या या वृक्षारोपण कार्यक्रमत वेगवेगळ्या प्रकारचे फळझाडे देशी वृक्षांची लागवड करण्यात आली. यात आंबा, चिंच, पेरू, चिकू, नारळ आदी वृक्षांनी हा परिसर व्यापून टाकण्यात आला. सफेद कपडे परिधान केलेले ब्रह्माकुमार व ब्रह्माकुमारी सदस्य पूर्ण हिरवळीवर सफेद माणिक मोती प्रमाणे वाटत होते.

# बावनकुळेंच्या अगाध ज्ञानाने भाजपच्या कार्यकर्त्यांना अश्रू अनावर!


राजकारणात आरोप-प्रत्यारोप होतच असतात. न्यायालयात आरोप सिद्ध होत नाहीत, तोपर्यंत संबंधित व्यक्ती गुन्हेगार नसतो. याचा विचार करून कुणाचेही मूल्यमापन व्हायला हवे, असे सूचक व वैचारिक क्रांतीचे विधान भाजपचे नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी केल्यानंतर नाशिक भाजपच्या कार्यकर्त्यांना अश्रू अनावर झाले असतील. कारण गेल्या कीत्येक वर्षांपासून 'सलीम कुत्ता'च नव्हे तर अनेक खतरनाक गुन्हेगारांचे समर्थक पक्षाच्या बाहेरच ताटकळत होते. आता अशा लोकांना पक्षात घेऊन समोरच्याला 'गारद' करणे सोपे जाणार की नाही? विधानसभा निवडणुकीत भाजपच्या आमदार सीमा हिरे आणि ठाकरे गटाचे सुधाकर बडगुजर यांच्यात लढत झाली होती. पण बावनकुळेंचे म्हणणे असे की, स्थानिक पातळीवर विरोध असल्याचे मान्य आहे. काही समज-गैरसमज असतात. ते दूर होण्यासाठी काही काळ जाऊ द्यावा लागतो. भाजपमध्ये बिनशर्त येणाऱ्यांना दरवाजे उघडे आहेत. आम्हालाही पक्ष संघटन वाढवायचे आहे. बावनकुळेंच्या या विधानामुळे अनेक 'भाईं'ना हायसे वाटले असेल. कारण अनेकांचे पक्षप्रवेश ताटकळले होते. ते लवकरच होणार असल्याची माहिती आमच्या हाती आली आहे. या सर्व 'भाईं'च्या पक्षप्रवेशाला बावनकुळेंनी अनेक संत महात्म्यांना निमंत्रण दिलेच असेल. पण हा सोहळा गोदावरीच्या काठावर त्यांच्या हस्ते गोदाआरती करूनच व्हावा, अशी अनेक 'भाईं'ची इच्छा आहे. ती जबाबदारी भाजपचे संकटमोचक गिरीश महाजन यांच्याकडेच द्यायला हवी. सुधाकर बडगुजरांचा पक्षप्रवेश झाला तर भाजपला प्रचंड फायदा होणार असल्याची माहिती प्रदेशाध्यक्षांना 'संकटमोचका'कडून मिळाल्याचे कळते. तत्पूर्वी बडगुजरांवर एकूण १७ गुन्हे दाखल असून त्यामुळे त्यांच्या प्रवेशास भाजप आमदारांसह पदाधिकाऱ्यांनी कडाडून विरोध केला होता. यावर सर्वात आघाडीवर नाशिक पश्चिमच्या आमदार सीमाताई हिरे होत्या. कारण त्यांनी निवडणुकीच्या काळात काय काय भोगले हे फक्त त्यांनाच माहिती आहे. त्यांनी कितीही आगपाखड केली तरी काही होणार नाही याचे सुतोवाच 'महासागर'ने दोन दिवसापूर्वीच केले होते. पण ते काहीही असो, बावनकुळेंचे विचार भाजपच्या कार्यकर्त्यांना खूपच प्रेरणादायी वाटले. कारण बावनकुळे यांच्या मते सत्ताधारी-विरोधक परस्परांवर आरोप-प्रत्यारोप करीतच असतात. गुन्हेही दाखल होतात. परंतु, न्यायालयात जोपर्यंत आरोप सिद्ध होत नाही, तोपर्यंत संबंधित व्यक्ती गुन्हेगार ठरत नाही, अशा प्रकारे कोणत्याही राजकीय पक्षातील व्यक्तीचे मूल्यमापन झाले पाहिजे. दस्तूरखुद्द प्रदेशाध्यक्षांनीच असे नमूद केल्यामुळे बडगुजर यांच्या भाजप प्रवेशाचा मार्ग मोकळा झाल्यातच जमा आहे. दरम्यान, आगामी सर्व निवडणुका महायुती एकत्रितपणे लढवेल. एखाद्या ठिकाणी 'मैत्रीपूर्ण' लढत होऊ शकते. त्यामुळे तिन्ही पक्षात वितुष्ट निर्माण होणार नसल्याचा दावा बावनकुळे यांनी केला आहे. त्यामुळे भाजपमध्ये काही आग लागली असेलच, तर नवीन 'भाई' मिटवायला येतच आहे ना!







एकेकाळी नाशिक शहरातील भाजप एका रिक्षात मावत होती. परंतु प्रचंड मेहनत कष्ट करून कार्यकर्त्यांनी हा पक्ष कुठल्या कुठे पोहोचवला. ज्यांनी हा पक्ष वाढविला, त्यापैकी अनेकजण हयात नाही. पोपटराव हिरे, बंडोपंत जोशी, गणपतराव काठे अशी सुरुवातीची काही नावे सांगता येतील. कालांतराने लक्ष्मण सावजी, विजय साने, प्रा. सुहास फरांदे अशी काही मोजकी नावे सांगता येतील. अलीकडच्या काळात नवी पिढी देखील पक्षात चांगलेच कार्यरत आहे. सतीशबापू सोनवणे, प्रशांत जाधव, गणेश कांबळे व नुकतेच भाजपच्या शहराध्यक्षपदी निवड झालेले सुनिल केदार अशी प्रामाणिक फौज देखील पक्षात कार्यरत आहेत. अशा कार्यकर्त्यांमुळेच आज भारतीय जनता पक्ष केंद्रात व राज्यात सत्तेत आहे. पण आज भाजपकडे नजर फिरविली तर ज्यांच्या जीवावर पक्ष मोठा झाला, त्यांचे कुणीच ऐकत नाही. अनेकांनी आपला वशिला 'संकटमोचका'कडे लावला. त्यामुळे त्यांना स्थानिक कार्यकर्त्यांची गरजही भासत नाही. पक्षाच्या नावावर काही ठेकेदार प्रचंड गब्बर झाले असून कोणता 'वाटा' कुठे द्यायचा, याचे त्यांना अगाध ज्ञान प्राप्त आहे. त्यामुळे अनेकांनी पक्षप्रवेशासाठी ठेकेदारांना हाताशी धरल्याची माहिती आहे. 'अर्थ'पूर्ण घडामोडी आता नको तेथे केल्या जाऊ लागल्या आहेत. शहरात भाजपचे तीन आमदार आहेत. जिल्ह्यात पाच आमदार आहेत. पण या सर्वांना पक्षाच्या चौकटीत असे काही बांधून ठेवले आहे की, त्याचे कार्य 'वरिष्ठांचा आदेश अंतिम' या एकाच शब्दाभोवती फिरत राहिल्याने त्यांचेही अवमूल्यन सुरू झाले आहे. नाशिक जिल्ह्यातील अनेक निर्णय वरून लादले जाऊ लागले आहेत. सीमाताई हिरे, देवयानी फरांदे, राहुल ढिकले यांना आपापल्या मतदारसंघात जी माणसं पक्षात नको आहे, नेमके त्यांनाच रेड कार्पेट अंथरले जात आहेत. त्यामुळे अनेकजण निराश झाले आहे. कारण एकदा का ही मंडळी पक्षात आली तर ते कब्जा घेणारच. कारण यापूर्वी ते कोणत्याही पक्षात होते, तरी त्यांच्याकडे उच्च पदे होतीच. त्यामुळे भाजपमध्ये येऊन ते कार्यकर्ते म्हणून थोडेच थांबणार? सुधाकर बडगुजर यांना भाजपने किंवा अन्य कोणत्याही पक्षाने त्यांच्या पक्षात प्रवेश दिला असेल तर कुणाचे आक्षेप असायचे कारण काहीच नाही. पण त्यांचा पक्षप्रवेश भाजपमध्ये होत आहे. पण मागील विधानसभेच्या काळात देवेंद्र फडणवीस यांनी तत्कालीन विधानसभेत सांगितले होते की, दाऊदच्या गँगमधील सदस्य आणि संबंधित व्यक्ती हे दोघे नाचत असल्याचा व्हीडिओ समोर आला आहे. तो पॅरोलवर असतानाचा हा व्हीडिओ आहे. पॅरोलवरील व्यक्तीला पार्टी देखील करता येत नसते. पार्टीपेक्षा हे महत्त्वाचं आहे की यातून काय संकेत जातो. बॉम्बस्फोटातील आरोपी सोबत जर कुणी पार्टी करत असेल तर याचा अर्थ त्यांच्या संवेदना मेल्या आहेत. मग आता फडणवीस यांनाच विचारावे लागेल की, आता कुणाच्या संवेदना मेल्या आहेत? ठाकरे गटाचे उपनेते सुधाकर बडगुजर यांनी महानगरप्रमुख विलास शिंदे यांच्यासह दहा ते बारा कार्यकर्ते पक्षात नाराज असल्याचा दावा केला होता. यामुळे नाशिकच्या राजकारणात मोठी खळबळ उडाली होती. त्यानंतर बुधवारी ठाकरे गटाकडून बडगुजर यांची पक्षातून हकालपट्टी करण्यात आली होती. आपल्याला बाजू मांडायची संधी न देता हकालपट्टी केल्याचा बडगुजर यांचा आरोप आहे. परंतु पक्षश्रेष्ठी त्यांच्याकडे आलेल्या गोपनीय माहितीच्या आधारावरच अशा कारवाया करीत असतात. त्यातच भाजपच्या पक्षश्रेष्ठींनी ज्या पद्धतीने बडगुजर यांच्यासाठी 'रेड कार्पेट' अंथरले आहे, त्यावरून ठाकरे गटाने केलेली हकाललपट्टी योग्य ठरते. सुधाकर बडगुजर भाजपमध्ये आले तर आगामी महापालिका निवडणुकीत भाजपची विशेष करून सिडको भागात चांगलीच ताकद वाढेल ही वस्तुस्थिती सत्य आहे. बडगुजर पती-पत्नी यांचे त्यांच्या प्रभागात चांगले काम आहे. त्यामुळे त्यांचा पक्षाला अन्य ठिकाणी फायदा होवो ना होवो, परंतु महापालिकेत भाजपच्या दोन जागा वाढतील हे नक्की. याशिवाय भाजपला शहरात आणखी एक ओबीसी चेहरा मिळू शकतो.






## सीमाताईंची आगपाखड वाया जाणार?

सुधाकर बडगुजर यांच्या पक्ष प्रवेशाबाबत गिरीश महाजन लक्ष घालत आहेत, असे सांगून बावनकुळे मोकळे झाले. परंतु, भारतीय जनता पक्षासारख्या शिस्तबद्ध पक्षात बाहेरून आलेल्यांचे विचार ऐकले जाते. परंतु निष्ठावानांना सध्या वेटींगवरच ठेवल्यासारखे दिसते. कारण सीमाताई हिरे स्वतः म्हणतात की, मी स्वतः बडगुजर यांच्या विरोधात दोन वेळा निवडणूक लढवली असून, त्यांनी आमच्या कार्यकर्त्यांना त्रास दिला आहे. तसेच त्यांनी आमच्या वरिष्ठ नेत्यांवर आक्षेपार्ह टीका केली आहे. चंद्रशेखर बावनकुळे यांच्याविषयी त्यांनी चुकीची माहिती पसरवली होती, तर नारायण राणे यांच्यावर त्यांनी अटक होईल अशी परिस्थिती निर्माण केली. त्यामुळे अशा व्यक्तीस पक्षात प्रवेश देऊ नये, अशी मागणी आम्ही पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांकडे केली आहे. बडगुजर यांच्यावर सध्या १७ गुन्हे दाखल असून, त्यांचे अंडरवर्ल्ड दाऊद इब्राहिमचा हस्तक सलीम कुत्ता याच्याशी संबंध असल्याची माहिती आहे. त्यांच्या मुलावरही एका गोळीबार प्रकरणात गुन्हा दाखल आहे. या सर्व प्रकरणांमधून स्वतःची सुटका व्हावी यासाठीच बडगुजर भाजपमध्ये येण्याचा प्रयत्न करत असावेत, असे त्यांनी म्हटले. परंतु पक्ष वाढीच्या नादात बाहेरून नाशिकमध्ये नेतृत्व करीत असलेल्या नेत्यांना त्याच्याशी काहीही देणे घेणे दिसत नाही.

## सलीम कुत्ता 'साहेबां'ना देखील पक्षात घ्या!

अनेक पक्ष फिरून अनेक ठेकेदार भाजपमध्ये आले. काही ठेकेदार भाजपच्या मित्र पक्षांमध्ये गेले. परंतु त्यांची सर्व कामे भाजपचे नेते मनमोकळेपणे करतात. त्यामुळे अनेक कार्यकर्त्यांना भाजपच्या आमदारांची किंवा नगरसेवकांची गरजही भासत नाही. ज्याचा त्याचा हिस्सा घरपोच पोहोचल्यावर कोण कशाला विरोध करेल? अलीकडे तर कार्यकर्त्याला साधे पत्र लागत असेल, तरी पत्रासाठी पैशाची मागणी केली जाते. लोकप्रतिनिधींनी आपल्या मतदारसंघात एखाद्या अधिकाऱ्याला आणण्याचा निर्णय घेतला रे घेतला की, वरून वेगळीच व्यक्ती हजर होते. लोकप्रतिनिधी देखील आता नावालाच राहिले आहे. त्यामुळे प्रत्येक जण मिळेल तिथे धुलाई करीत आहे. कुणालाही पक्षात विरोध करायचा नाही, असा अनेक लोकप्रतिनिधींनी निर्णय घेतला आहे. अगदी सलीम कुत्ता 'साहेबां'ना देखील पक्षात घ्यायला आपण विरोध करणार नसल्याचे अनेक लोकप्रतिनिधींनी सांगितले. त्यातच चंद्रशेखर बावनकुळे यांचे सिंगापूर येथील 'कॅसिनो' प्रकरण व नारायण राणे यांना अटक करावी यासाठी ज्या सुधाकर बडगुजर यांनी पुढाकार घेतला होता, त्यांनाच क्लीन चिट देण्यासाठी नारायण राणे यांचे मंत्रीपुत्र नव हिंदुत्ववादी नेते नितेश राणे यांनीही पुढाकार घेतल्याने नाशिक मधील भाजपच्या नेत्यांची मोठी कोंडी झाली आहे.

# पिकअप- मोटर सायकलच्या अपघातात चुलता-पुतणी जखमी

**मनमाड ।** मनमाड-नांदगाव मार्गावर हिसवळ शिवारात पिकअप व मोटर सायकलच्या अपघातात कऱ्ही येथील चुलता पुतणी जखमी झाले आहे. दरम्यान वेहळगाव येथील आशा सेविका ज्योती चेतन केदार (वय २८) या कऱ्ही माहेरी आलेल्या होत्या.त्यांची नांदगाव येथे मिटिंग असल्याने चुलते महेश काकड यांच्या सोबत त्या नांदगाव येथे गेल्या होत्या मिटनिंग आवरून घरी परतत असताना समोररून कुंपण जाळीने भरून येणारी पिकअप नंबर एमएच,१५,एच एच-१२३९ ही गाडी समोरून नागमोडी पद्धतीने येत असल्याने मोटरसायकल चालकाला काही कळेना त्याने स्पीड कमी केले मात्र पिकअपने समोरून येऊन धडक दिली त्यात मोटरसायकलस्वार महेश काकड रा.कऱ्ही व त्यांच्या मागे बसलेली पुतणी ज्योती केदार रा. वेहळगाव हे जखमी झाले आहे. त्यांना तत्काळ मनमाड येथे दाखल करण्यात आले परंतु सौ.ज्योती केदार यांना डोक्याला,डाव्यापायाला व खांद्याला जबर मार लागलेला असल्याने त्यांची परिस्थिती गंभीर असून त्यांना नाशिक येथे हलविण्यात आले आहे.तर चुलत्यावर मनमाड येथे उपचार सुरु आहे.



# उमराणे येथे जाणता राजा मित्र मंडळातर्फे शिवराज्याभिषेक सोहळा

**देवळा ।** उमराणे येथे जाणता राजा मित्र मंडळ व ग्रामस्थांच्या वतीने हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी राजे शिवराज्याभिषेक सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

उमराणे मावळखो-यातील जाणता राजा मित्र मंडळाच्या वतीने यावर्षीही हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजीराजे शिवराज्याभिषेक दिना निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते प्रथमता उमराणे वतनाचे दैवत श्री रामेश्वर महादेव मंदिरात श्री.ज्ञानेश्वर देवरे यांच्या हस्ते श्रीफळ अर्पण करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली तसेच स्वराज्याच्या भगव्या ध्वजाचे पूजन जिभाऊ देवरे यांच्या हस्ते करण्यात आले.तसेच शिव राजमुद्रेचे पूजन शरद जाधव यांच्या हस्ते करण्यात आले.छत्रपती शिवाजीराजे यांच्या प्रतिमेचे पूजन भारतीय सैन्य दलात कार्यरत असलेले दादाजी कारभारी देवरे यांच्या हस्ते अर्पण करण्यात आले. त्यानंतर गाडगेबाबाचा आदर्श घेऊन उमराणे व परिसरातील नागरिकांसाठी रात्रदिवस सेवा करणारे जनसेवक बाबुराव देवरे यांचा संजय देवरे यांच्या हस्ते शिवचरित्र भेट देऊन सन्मानित करण्यात आले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वनरक्षक अनिल पवार हे होते प्रमुख पाहुणे म्हणुन माजी सभापती धर्मा देवरे, माजी सरपंच मोतीराम देवरे, हिरामण देवरे, प्रल्हाद जमधाडे, केदा देवरे, दत्तु देवरे, विजय पगारे, अनिल पाटणी, पंडित देवरे, समाधान देवरे, डी.व्ही. देवरे, माणिक देवरे उपस्थित होते.

यावेळी मंडळाचे अध्यक्ष नंदन देवरे यांनी प्रास्ताविक केले तसेच अध्यक्षीय भाषणात पवार यांनी छत्रपती शिवाजीराजे यांनी आपल्या ५० वर्षीच्या कालखंडात स्वराज्य निर्माण करण्यासाठी ज्या मावळे सरदार किल्लेदार यांनी जीवाची बाजी लावली अशा प्रत्येकाची काळजी घेणारा राजा म्हणजे छत्रपती शिवाजी राजे यांचा आदर्श घेऊन जाणता राजा मंडळाने गावाच्या हितासाठी झटणाऱ्या नागरिकांचा सन्मान करून गौरव करण्याचे वारसा अखंडपणे सुरु असल्याचा आम्हाला अभिमान आहे या मंडळाच्या कार्याचा तरुणांनी आदर्श घ्यावा असे आव्हान कार्यक्रमा प्रसंगी केले संदीप देवरे यांनी आभार मानले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंडळाचे मावळे व ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले.

## ➤ महत्त्वाचे

### छत्रपती शिवरायांचे राज्य एक आदर्श राज्य : प्राचार्या वाघ

**नाशिक ।** मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या एस.व्ही.के.टी. कला, विज्ञान आणि



वाणिज्य महाविद्यालय देवळाली कॅम्प येथे शिवस्वराज्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉक्टर प्रतिमा वाघ यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. त्यांनी छत्रपती शिवरायांच्या राज्याभिषेकाचे महत्त्व विशद करून शिवरायांनी चालवलेला राज्य कारभार आदर्श व समाजाभिमुख असल्याचे म्हटले. आजही आपणास अशा राज्यव्यवस्थेची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक इतिहास विभाग प्रमुख प्राध्यापक एस. डब्ल्यू. पवार यांनी केले. या याप्रसंगी वाणिज्य विभाग प्रमुख प्राध्यापक डॉक्टर विजय गायकवाड, कनिष्ठ विभाग प्रमुख पाटील, अमृतकर, हाळदे, प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी कार्यक्रमास उपस्थित होते. आभार प्राध्यापक राजेंद्र सोनवणे यांनी व्यक्त केले.

# कुटुंबापासून त्रासलेल्या माय लेकीला मायेचा आधार

## पिंपळगाव पोलिसांचे सामाजिक संदेश देणारे कार्य

**पिंपळगाव बसवंत ।** पोलिस म्हटले की, खाकी वर्दीतील तापट स्वभावाचा, कडक शब्दात बोलणारा, हेकेखोर, असंवेदनशील व्यक्ती अशीच प्रतिमा सर्वसामान्यांच्या मनात असते. त्यामुळे अनेकजण पोलिसांपुढे जाण्यास घाबरतात. पोलिस म्हटले की, इतका धाक हवाच. पोलिसांना कर्तव्यासाठी वेळप्रसंगी थोडे कठोर व्हावे लागते. असे असले, तरी या वर्दीतही मनुष्य असतो, त्यालाही मन, भावना असतात. ड्युटीसाठी कठोर बनलेला हा वर्दीतील माणूस वेळप्रसंगी मनाने तितकाच मृदू होतो. अशाच खाकी वर्दीत दडलेल्या पिंपळगाव पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दुर्गेश तिवारी यांनी माणुसकीचे दर्शन घडविले आपल्या पती आणि माहेरच्या व्यक्तींकडून त्रासलेल्या दोन चिमुकल्या आणि एका मातेला मायेचा आधार देत वर्दीतील माणुसकीची ओळख करून दिली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, गेल्या काही दिवसापासून पिंपळगाव बसवंत शहरात मंदिर परिसरात अंदाजे पाच ते सहा वर्षीय दोन चिमुकल्या तसेच एक महिला परिसरात आढळून आली यावेळी काही सामाजिक कार्यकर्ते दत्तू झनकर व त्यांच्या मित्रांनी त्यांना पिंपळगाव पोलिसांशी संपर्क साधत त्यांच्या स्वाधीन केले त्यानंतर पोलिसांनी तिची विचारपूस केली असता सदर महिला पनवेल येथील असल्याचे सांगत होती पण पती आणि माहेरची व्यक्ती मानसिक आणि शारीरिक त्रास देत असत आणि त्यानंतर दोन चिमुकल्यांसह त्यांनी घराबाहेर काढून दिले. तेव्हापासून गेल्या दोन महिन्यापासून नाशिक जिल्हात दोन मुलींना घेऊन भटकंटी करत आहे. पुन्हा पती आणि माहेरी जायचं नाही असेच जगायचं मात्र मुलींची काळजी असल्याचे सांगितले. यादरम्यान पोलीस निरीक्षक दुर्गेश तिवारी यांनी त्यांना पोटभर खाऊ पिऊ घातले. व प्रवासासाठी काही पैसे दिले.मात्र दोन मुलींना घेऊन जायचे कुठे असा गंभीर प्रश्न त्या महिलेला पडला तेव्हा पोलीस निरीक्षक तिवारी यांनी त्या मुलींना शाळेत जाल का.? तेव्हा मोठ्या उंच स्वरात मुलीं हो म्हणाल्या आणि डॉक्टर पोलीस आम्हाला व्हायचं असे म्हटल्यावर अक्षरशः पोलीस अधिकाऱ्याचे डोळे पन्हावले यावेळी येवला येथील सैंगऋषीं वृद्ध अनाथ आश्रमास संपर्क साधून सदर निराधार महिला व त्या दोन चिमुकलींना त्यांच्या स्वाधीन करून त्यांना आधार दिला. यावेळी मोठ्या आनंदात ते आश्रमात गेले. यादरम्यान पोलीस निरीक्षक दुर्गेश तिवारी, सैंगऋषीं वृद्ध अनाथ आश्रमाचे नवनाथ जऱ्हाड, गोकुळ खैरनार, विकास वाळुंज, शुभम उगले,सामाजिक कार्यकर्ते दत्तू झनकर, महिला पोलीस हवालदार उर्मिला काठे, सविता धामणे आदि उपस्थित परिश्रम घेतले.



> “ सध्या कौटुंबिक वादातून अनेक असे प्रकार घडत असून निष्पाप लहान चिमुकल्यांचे भविष्य संपुष्टात येत आहे. पालकांनी आपल्या पती-पत्नीच्या किंवा कौटुंबिक नात्यात क्लेश निर्माण करण्या अगोदर आपल्या मुलांचा आणि परिवाराचा विचार करणे गरजेचे आहे तेव्हा कुठेतरी असे प्रकार रोखले जाऊ शकतात.
>
> **– दुर्गेश तिवारी, पोलीस निरीक्षक**

> “ आमच्या आश्रमामध्ये आतापर्यंत अनेक वृद्ध तसेच अनाथ महिला मुले मुली व व्यक्ती असून आज पिंपळगाव पोलीस ठाण्याच्या मार्फत एक निराधार महिला आणि त्यांच्यासोबत लक्ष्मी आणि रेणुका नावाच्या दोन चिमुकल्या मिळाल्या आहे. त्या दोन चिमुकल्या मुलींना भविष्यात चांगले शिक्षण घेऊन डॉक्टर आणि पोलीस व्हायचं आहे. आमच्या आश्रमाच्या माध्यमातून त्यांचे नक्कीच चांगले शिक्षण होईल आणि त्यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आम्ही प्रयत्न करू.
>
> **– नवनाथ जऱ्हाड, संस्थापक, सैंगऋषीं वृद्ध अनाथ आश्रम, येवला**

